




दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■








●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक ३०२ ●सोमवार,दि.०२ फेब्रुवारी २०२६ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955




# केंद्रीय अर्थसंकल्प सादर

## निर्मला सीतारामन यांची मोठी घोषणा

**नवी दिल्ली**

अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी मोदी सरकारचा अर्थसंकल्प सादर केला. हा त्यांचा सलग नववा केंद्रीय अर्थसंकल्प आहे. या अर्थसंकल्पासह त्यांनी एक विक्रम प्रस्थापित केला आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी रविवारी सकाळी ११ वाजता देशाचा अर्थसंकल्प सादर केला. या अर्थसंकल्पासह, त्या सलग नवव्यांदा देशाचा अर्थसंकल्प सादर करणाऱ्या जगातील पहिल्या महिला अर्थमंत्री बनल्या. मोदी सरकारच्या या अर्थसंकल्पाकडून लोकांच्या अनेक अपेक्षा आहेत. काय स्वस्त होईल आणि काय महाग होईल याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. अर्थसंकल्पीय भाषणात अर्थमंत्र्यांनी सांगितले की, विशेषतः भारतात उत्पादित होणाऱ्या वस्तूंवरील सीमाशुल्क कमी केले जात आहे. ▶▶ उर्वरित पान २ वर

### ● काय स्वस्त होणार ?

कपडे, चामड्याच्या वस्तू, सिंथेटिक पादत्राणे, चामड्याचे उत्पादने, १७ कर्करोग आणि मधुमेहावरील औषधे शुल्कमुक्त, लिथियम-आयन बॅटरी, मोबाइल बॅटरी स्वस्त होणार, सौर ग्लास स्वस्त होणार, मिश्र वायू सीएनजी, ईव्ही, मायक्रोवेव्ह ओव्हन, विमान इंधन, परदेश प्रवास

### ● काय महागणार ?

याव्यतिरिक्त, ज्या क्षेत्रांमध्ये कस्टम ड्युटी वाढवल्या गेल्या आहेत, म्हणजेच ज्या वस्तू अधिक महाग होणार आहेत त्यामध्ये दारू, भंगार, सिगारेट खनिजे आणि पीव्हीसी फ्लेक्स शीट यांचा समावेश आहे.

● संसदेत अर्थसंकल्पीय भाषणादरम्यान अर्थमंत्री निर्मला सीतारामन म्हणाल्या, आत्मनिर्भरता हे आपले मार्गदर्शक तत्व असल्याने, आम्ही देशांतर्गत उत्पादन क्षमता, ऊर्जा सुरक्षा आणि आवश्यक आयातीवरील अवलंबित्व कमी केले आहे. त्याच वेळी, आम्ही सरकारच्या प्रत्येक कृतीचा नागरिकांना फायदा मिळावा याची खात्री केली आहे. रोजगार निर्मिती, कृषी उत्पादकता सुधारण्यासाठी, घरगुती खरेदी शक्ती सुधारण्यासाठी आणि लोकांना सार्वत्रिक सेवा प्रदान करण्यासाठी सुधारणा लागू करण्यात आल्या आहेत. या उपाययोजनांमुळे सुमारे ७% उच्च विकास दर झाला आहे आणि गरिबी कमी करण्यास आणि आपल्या लोकांचे जीवन सुधारण्यास लक्षणीय मदत झाली आहे.

## अर्थसंकल्पानंतर सेन्सेक्स तब्बल १,५४६ अंकांनी घसरला, निफ्टी देखील ४९५ अंकांनी घसरला; गेल्या सात वर्षांत प्रथमच अर्थसंकल्प दिनी सर्वात मोठी घसरण

**मुंबई । प्रतिनिधी**

अर्थसंकल्पानंतर, (१ फेब्रुवारी) शेअर बाजार घसरणीसह बंद झाला. सेन्सेक्स १,५४६ अंकांनी किंवा जवळपास २ टक्क्यांनी घसरून ८०,७२२ वर बंद झाला. निफ्टी देखील ४९५ अंकांनी घसरून २४,८२५ वर बंद झाला. अर्थसंकल्पात फ्युचर्सवरील सिक्युरिटीज ट्रान्झॅक्शन टॅक्स (एसटीटी) ०.०२ वरून ०.०५ टक्क्यांपर्यंत वाढवला. ऑप्शन्स प्रीमियम आणि एक्सरसाइज ऑप्शन्सवरील एसटीटी देखील ०.१५ टक्क्यांपर्यंत वाढवण्यात आला आहे. बाजारात ही घसरण होण्याचे कारण हेच आहे. गेल्या सात वर्षांतील अर्थसंकल्पाच्या दिवशी ही सर्वात मोठी घसरण आहे. यापूर्वी, २०२०-२१ मध्ये



अर्थसंकल्पाच्या दिवशी सेन्सेक्स ९८७ अंकांनी आणि निफ्टी ३०० अंकांनी खाली बंद झाला.

सार्वजनिक क्षेत्रातील बँक क्षेत्रात सर्वात मोठी घसरण- सेन्सेक्सच्या ३० समभागांपैकी आज २७ समभाग घसरले, तर फक्त तीन समभाग वाढले. इएडः, डइख आणि अदानी पोर्ट्सचे शेअर्स ६ टक्क्यांपर्यंत घसरले. सार्वजनिक क्षेत्रातील बँक क्षेत्रात सर्वात मोठी घसरण झाली, ६ टक्क्यांपर्यंत घसरली. धातू, मीडिया, FMCG, मीडिया, फार्मा, वित्तीय सेवा आणि रिअल्टी क्षेत्रांमध्येही घसरण झाली. अर्थसंकल्पाच्या दिवशी बाजारातील हालचाल- अर्थसंकल्पीय भाषणानंतर: व्यवहार ▶▶ उर्वरित पान २ वर

### ● अर्थसंकल्प प्रतिक्रिया



केंद्रीय अर्थसंकल्प २०२६-२७ मध्ये पायाभूत सुविधा, शेती, महिला आणि युवक यांच्यावर लक्ष केंद्रित करून समावेशक विकासाचा दृष्टिकोन मांडण्यात आला आहे. विक्रमी पायाभूत गुंतवणुकीचा महाराष्ट्राच्या औद्योगिक, कृषी व दळणवळण क्षेत्राला मोठा लाभ होईल. शेतीत उत्पादनक्षमता व प्रक्रिया उद्योगांवर दिलेला भर शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीस पूरक ठरेल. महिलांसाठी स्वयंरोजगार व आर्थिक समावेशनाच्या उपाययोजनांमुळे गरीब व मध्यमवर्गीय महिलांना नवी संधी मिळेल, तर युवकांसाठी कौशल्य विकास व स्टार्ट-अप्समुळे रोजगारनिर्मितीस चालना मिळेल. हा अर्थसंकल्प केंद्र-राज्य समन्वयातून प्रभावीपणे राबवला तर महाराष्ट्राच्या विकासाला नवी दिशा देणारा ठरेल असा विश्वास वाटतो -धनंजय मुंडे

## अजित पवारांच्या विमान अपघातावर अमोल मिटकरींचे गंभीर सवाल; सरकारकडे स्पष्टीकरणाची मागणी



**मुंबई । प्रतिनिधी**

माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातावर आमदार अमोल मिटकरी यांनी गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. 'एबीपी माझा'शी एक्सक्लूझिव्ह बातचीत करताना त्यांनी सरकार आणि संबंधित यंत्रणांनी या प्रश्नांची स्पष्ट उत्तरे द्यावीत, अशी मागणी केली. मिटकरी यांनी सांगितले की, अपघातानंतर डीजीसीएने सहा मृत्यू झाल्याचे जाहीर केले होते, मात्र प्रत्यक्षात पाच मृतदेहच समोर आले, हे संशयास्पद आहे. तसेच, विमान आणि वैमानिकाचा पूर्व इतिहास माहिती असूनही तेच विमान व तोच वैमानिक कसा देण्यात आला, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. याशिवाय, आदल्या रात्री अजित पवारांचा दौरा वेगळा असताना ऐनवेळी विमानाने प्रवास करण्याचा निर्णय कसा झाला, याबाबतही त्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले. या प्रकरणी लवकरच पंतप्रधान केंद्रीय गृहमंत्र्यांची भेट घेणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

## नोकरीचे आमिष दाखवून शिक्षिकेचे लैंगिक शोषण

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

तालुक्यातील धायगुडापिंपळा येथे एका २८ वर्षीय सहशिक्षिकेचे नोकरीचे आमिष दाखवून गेल्या तीन वषारपासून लैंगिक शोषण केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी चौघांवर अंबाजोगाई ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी पीडितेने ३० जानेवारी रोजी पोलिसात तक्रार दाखल केली आहे. तक्रारीनुसार, आरोपी मोहीन बासद शेख याने पीडितेचे फोटो आणि व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी देऊन हे कृत्य केले. १६ जानेवारी रोजी पीडितेच्या घरात शिरून आरोपीने तिला धमकी दिली होती. आरोपी मोहीन याला त्याचे भाऊ बाबा शेख, इरशाद शेख आणि मोसीन शेख यांनी देखील साथ दिली आणि पीडितेच्या पतीला जीवे मारण्याची धमकी दिली. पोलिसांनी चौघांविरुद्ध बलात्कार आणि धमकावल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक जाधवर या प्रकरणाचा तपास करत आहेत.

## 'तेराव्या दिवशी सर्व सांगणार', अजित पवारांच्या निधनानंतर रोहित पवार करणार मोठा गौप्यस्फोट!

**पुणे । प्रतिनिधी**

अजित पवारांच्या निधनाचा धक्का सहन न झाल्याने हृदयविकाराचा झटका येऊन त्यांच्या समर्थकाचा मृत्यू झाला होता. सुदाम बोडके असे त्यांचे नाव असून ते ६३ वर्षांचे होते. अजित पवार यांचे कट्टर समर्थक अशी ओळख होती. आधीच अजित पवारांच्या निधनामुळे दुःखात असलेल्या बोडके कुटुंबाला आणखी एक धक्का बसला. दरम्यान शरद पवार यांच्या राष्ट्रवादीचे नेते रोहित पवार यांनी बोडके यांच्या कुटुंबाची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. यावेळी त्यांनी



स्पष्ट शब्दात इशारादेखील दिला.

नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी तालुक्यातील ढकांबे गावचे रहिवासी असलेले सुदाम बोडके यांनी अजित पवार यांच्या निधनाची बातमी ऐकून तीव्र धक्का बसल्याने ते अस्वस्थ झाले होते. दादांची बातमी आपण ऐकली बातमी खरी आहे स्वप्न आहे हे आम्हला कळते नाही. आजपर्यंत आम्ही त्या दुःखात आहोत. त्या विमानातील आणखी जे होते त्याचा परिवार दुःखात होता. अजित पवारांच्या निधनाची बातमी कळली तेव्हा कट्टर कार्यकर्ते अस्वस्थ झाले. नंतर ते हॉस्पिटल मध्ये गेले आणि त्यांचा मृत्यू झाल्याचे कळाले. पवार परिवार आणि हा परिवार दुःखात आहे. मी त्यांच्या कुटुंबाशी चर्चा करुन त्यांचे सांत्वन केल्याचे रोहित पवार म्हणाले. पक्ष विलिनीकरणाबाबत अजित ▶▶ उर्वरित पान २ वर

## संत गजानन महाराजांच्या प्रगटदिन सोहळ्यास आजपासून सुरूवात

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील सहयोगनगर भागात असलेल्या संतश्रेष्ठ गजानन महाराज मंदीराला यावर्षी २५ वर्षा पूर्ण होत असल्याने रौप्य महोत्सवी प्रगटदिन उत्सवास सोमवार दि. २ फेब्रुवारीपासून प्रारंभ होत आहे. यानिमित्त सात दिवस विविध धार्मिक कार्यक्र मांचे आयोजन करण्यात आले आहे. शहरातील सहयोगनगर भागातील संतश्रेष्ठ गजानन ▶▶ उर्वरित पान २ वर



## अजितदादा लोकांच्या मनातील नेते, त्यांनी कधीच जातीधर्माचा विचार केला नाही

### अंबाजोगाई येथे शोकसभा ; शोकाकुल वातावरणात सर्वपक्षीय शोक संवेदना

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अजितदादा पवार हे कर्तृत्ववान, शिस्त, वक्तशीरपणा, दिलेला शब्द पाळणारे, कार्यकर्त्यांवर जिवापाड प्रेम करणारे व लोकांच्या मनातील नेते होते. त्यांनी कधीच जातीधर्माचा विचार केला ▶▶ उर्वरित पान २ वर




## ऊस तोडणीसाठी गेलेल्या पारधी समाजातील तरुणांना जबर मारहाण



**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील पारधी समाजाचे ऊस तोड मजूर हे पश्चिम महाराष्ट्रातील एका कारखान्यावर ऊस तोडणीसाठी गेले असताना त्यांना एका वाहनातून अज्ञात ठिकाणी नेऊन जबर मारहाण केली आहे. त्यांच्या सवारगावर मारहाणीचे वळ उठलेले असून भेदरलेले हे युवक गावाकडे पळून आले आहेत. अद्याप या प्रकरणी गुन्हा दाखल झालेला नाही. केज तालुक्यातील केवड येथील श्रावण महादेव ▶▶ उर्वरित पान २ वर

## बीड जिल्ह्याने पाहिलेले विकासाचे स्वप्न सुनेत्र ताईंच्या माध्यमातून पुर्ण होईल: अमरसिंह पंडित

● अजितदादांच्या आठवणी बीडकरांनी जागवल्या
● बीड येथे शोकाकुल वातावरणात सर्वपक्षीय शोकसभेचे आयोजन



**बीड । प्रतिनिधी**

दोन दिवस झाले तरी दादा आपल्यात नाहीत असे मनाला पटत नाही दादांच्या जाण्याने बीड सह महाराष्ट्राचे प्रचंड नुकसान झालेले आहे. अजित दादांचे नाव घेतल्याशिवाय महाराष्ट्राचा राजकीय इतिहास लिहिला जाऊ शकणार नाही. बीड जिल्ह्याच्या सामान्य जनतेने अजित दादा यांच्या माध्यमातून पाहिलेले विकासाचे स्वप्न उपमुख्यमंत्री सुनेत्राताईच्या माध्यमातून पूर्ण होईल अशी अपेक्षा व्यक्त करत स्वर्गीय अजितदादांच्या आठवणींना माजी आमदार तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित यांनी भावनिक उजाळा दिला. यावेळी बीड जिल्ह्यातील सर्व राजकीय पक्षांचे जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार व अजित दादा प्रेमी मोठ्या संख्येने शोकसभेला उपस्थित होते.

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या आकस्मिक दुःखद निधनाच्या निमित्ताने बीड येथील रामकृष्ण मंगल ▶▶ उर्वरित पान २ वर




# इतिहासातीलकाळा दिवस : छत्रपती संभाजी राजांना संगमेशवर येथे मोगलांकडुन छापा घालून कैद करण्यात आले

१ फेब्रुवारी १६८९ या दिवशी शेख निजामाने संगमेश्वर येथे अचानक छापा टाकला. त्यात छत्रपती संभाजी राजे व कवी कलश हे दोघे जण कैद झाले. त्या वेळेस औरंगजेबाचा मुक्काम अकलूजला होता. त्याने तेथून हुकूम फर्माविला, की कैद्यांना पेडगाव येथील बहादूर गडाच्या छावणीत आणण्यात यावे.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाचा धसका, जेवढी भीती मुघल सम्राट औरंगजेब आणि त्यांच्या सरदारांनी घेतली होती, तेवढाच धसका अगर भीती छत्रपती संभाजी महाराजांचीही औरंगजेब व त्याच्या पराक्रमी म्हणवल्या जाणा–या सेनापती व सरदारांनीही घेतली होती. छत्रपती शिवाजी महाराजांच्या दुर्दैवी मृत्यूनंतर मराठयांचे राज्य आपण चुटकीसरशी सहजपणे जिंकतो. असे मुघल सम्राट औरंगजेबाला वाटत होते. त्यासाठी इ.स. १६८२ मध्ये मोठया ईर्षेने ७ लाखांची फौज घेऊन तो महाराष्ट्रात आला होता. या लढयात त्याने आपले तीनही मुलगे शाहजादा मुअज्जम, शाहजादा आज्जम,सुल्ताना कामबक्ष,नातू तसेच अनेक अनुभवी मातब्बर सरदार उतरवले होते. त्यावेळी केवळ ५० हजाराचे सैन्यबळ असतानाही छत्रपती संभाजी महाराजांनी ज्या हिमतीने मुघलांच्या त्या आक्रमणाशी झुंज दिली, ती अतुलनीय अशीच होती. छत्रपती संभाजी राजांना पराभूत करून हिंदवी स्वराज्य काबीज करण्यासाठी योजना आखण्यासाठी औरंगजेबाने शाही दरबार बोलवला. त्या दरबारात औरंगजेबाने आपल्या प्रमुख सरदारांकडे छत्रपती संभाजी राजांच्या विरोधात लढण्याची मोहिम त्या सरदारांकडून कोणीतरी स्वीकारावी यासाठी प्रस्ताव ठेवला. परंतु महापराक्रमी छत्रपती संभाजी राजांच्या विरोधात लढण्याच्या मोहिमेचे नेतृत्व करायला औरंगजेबाच्या त्या शाही दरबारातील कोणीही सरदार पुढे आला नाही.त्यावेळी संताप अनावर झाल्याने औरंगजेबाने आपल्या डोक्यावरचा किमॉश (पगडी) काढून फेकून दिला आणि संभाला पकडल्याशिवाय डोक्यावर किमॉश चढविणार नाही अशा प्रतिज्ञा केली. ८ वर्षे ८ महिने छत्रपती संभाजी राजे कायम रणांगणावर मुघलांच्या सैन्याशी लढत होते. एवढा अद्भुत पराक्रम त्यांच्या अंगी होता. त्याकाळात ७ वर्षे औरंगजेब आपल्या दरबारात डोक्यावर किमॉश न घालता बोडका होऊन बसत असे. त्याकारणाने त्याच्या मनातील छत्रपती संभाजी राजांबद्दलचा द्वेष खदखदत होता. इ.स. १६८९ च्या सुरवातीला छत्रपती संभाजीराजांनी त्यांच्या महत्त्वाच्या सरदारांना बैठकीसाठी कोकणात संगमेश्वर येथे बोलावले. १ फेब्रुवारी, इ.स. १६८९ रोजी बैठक संपवून छत्रपती संभाजीराजे रायगडाकडे रवाना होत. मराठयांत आणि शत्रूचे सैन्यात चकमक झाली. मराठयांचे संख्याबळ कमी होते. प्रयत्नांची शर्थ करूनही मराठे शत्रूचा हल्ला परतवून लावू शकले नाहीत. शत्रूने संभाजीराजांना व त्यांच्यासोबत असलेल्या कवि कलश यांना जिवंत पकडले. धर्मवीर संभाजी महाराजांना कोकणातील संगमेश्वर येथे घनघोर युद्ध करताना कैद केल्यानंतर कराड, वादुस, दहिवडी, फलटण, बारामती, कुरकुंभ, दौंड मार्गे पेडगाव, ता.श्रीगोंदा येथील किल्ल्यावर आणले. त्याच दरम्यान औरंगजेबाची छावणीही अकलूज वरून ती किल्ल्या जवळील खंडोबाच्या माळावर सरस्वती नदीकाठी उभारण्यात आली या छावणीत सुमारे आठ लाख सैनिक व जनावरे असा लवाजमा संगती होता.औरंगझेबाला ही खबर देण्यात आली,हुजुर,संभा कैद हो गया. मात्र प्रथम औरंगझेब भडकला आणि आल्या हेराला औरंगझेब म्हणाला,क्या बकते हो? पीके तो नहीं आये? संभा गिरफ्तार हो गया? हां हुजुर,संगमेश्वरी मुर्करबखानने दस्त कर लिया उन्हें. त्याच क्षणी औरंगझेबने फरमान सोडले, लाया जाय उसे शानो शौकत से..त्याला पोलादी साखल दंडानी जखडवा,उन्टाला बांधा,विदुशकी झबली घाला,घुंगर असलेली टोपी अड़कवा त्याच्या डोक्यातआणि वाजत–गाजत धिंड काढा त्याची..! समजू द्या या महाराष्ट्राला की औरंगझेबाने कैद केलाय संभाजीला.! त्या वेळी मोगलांनी लाखो सैनिकांच्या बंदोबस्तात राजांची धिंड काढली. त्यांना शारीरिक आणि मानसिक यातना दिल्या. विदूषकाचा पोषाख घालून, लाकडी सापळयात हातपाय अडकवण्यात आले. दोघांच्याही डोक्यावर एखाद्या अट्टल गुन्हेगारांना बांधाव्यात अशा इराणी लाकडी टोप्या बसवलेल्या होत्या. त्याच प्रमाणे 'तख्तेकुलाह' म्हणजे लाकडी फळ्यांचा खोडा मानेवर ठेवून त्याला दोन्ही हात बांधलेले होते. १५ फेब्रुवारी १६८९ या दिवशी औरंगजेबाबरोबर राजांची दृष्टीभेट पेडगावच्या किल्ल्यात झाली. ऋकाफिरांचा राजा सापडला' म्हणून औरंगजेबाने नमाज पढून अल्लाचे आभार मानून अत्यानंद व्यक्त केला. त्या वेळी छत्रपती संभाजीराजांना औरंगजेबाचा वजीर इरवलासखान याने शरण येण्याचे आवाहन केले. संतप्त संभाजीराजांनी औरंगजेबाला मुजरा करण्यास नकार दिला. आपल्या वडिलांनी निर्माण केलेली स्वाभिमानाची महान परंपरा त्यांनी जपली. यानंतर दोन दिवसांत औरंगजेबाच्या अनेक सरदारांनी त्यांचे मन वळवण्याचा प्रयत्न केला. त्यांना ऋमुसलमान झाल्यास जीवदान मिळेल', असे सांगण्यात आले; परंतु स्वाभिमानी संभाजीराजांनी या मुसलमान सरदारांचा सतत अपमान केला.

शेवटी औरंग्याने त्यांचे डोळे फोडले, जीभ छाटली तरीही राजांना मृत्यू स्पर्श करू शकला नाही. दुष्ट मोगल सरदारांनी त्यांना प्रचंड यातना दिल्या. ११ मार्चच्या फाल्गुन अमावस्येला संभाजीराजांची हत्या करण्यात आली. भाल्याला त्यांचे मस्तक टोचून मोगलांनी त्याची धिंड काढली. अशा प्रकारे १ फेब्रुवारी ते ११ मार्च असे ३९ दिवस यमयातना सहन करून संभाजीराजांनी हिंदुत्वाचे तेज वाढवले. धर्मासाठी बलीदान करणारा हा राजा इतिहासात अमर झाला. औरंगजेब मात्र राजधर्म पायदळी तुडवणारा इतिहासाच्या दरबारातील गुन्हेगार ठरला. संभाजीराजांच्या या बलीदानामुळे संपूर्ण महाराष्ट्र पेटून उठला आणि पापी औरंग्याबरोबर मराठ्यांचा निर्णायक संघर्ष सुरू झाला. ऋगवताला भाले फुटले आणि घराघरांचे किल्ले झाले, घराघरातील माता–भगिनी आपल्या मर्दाला राजाच्या हत्येचा सूड घ्यायला सांगू लागल्या', असे त्या काळाचे सार्थ वर्णन आहे. संभाजी महाराजांच्या बलीदानामुळे मराठ्यांचा स्वाभिमान पुन्हा जागा झाला, ही तीनशे वर्षांपूर्वीच्या राष्ट्रजीवनातील अतिशय महत्त्वाची बाब ठरली. यामुळे इतिहासाला कलाटणी मिळाली. जनतेच्या पाठिंब्यामुळे मराठ्यांचे सैन्य वाढत गेले अखेर महाराष्ट्रातच २७ वर्षांच्या निष्फळ युद्धानंतर औरंगजेबाचा अंत झाला आणि मोगलांच्या सत्तेला उतरती कळा लागून हिंदूंच्या शक्तीशाली साम्राज्याचा उदय झाला. २७ वर्षे औरंगजेबाच्या पाशवी आक्रमणाविरुद्ध मराठ्यांनी केलेल्या संघर्षात हंबीरराव, संताजी, धनाजी असे अनेक युद्धनेते होते; परंतु या लढ्याला कलाटणी मिळाली ती संभाजीराजांच्या बलीदानातून झालेल्या जागृतीमुळेच. संभाजी महाराजांचे चरित्र एका व्यक्तिशिवाय पुर्णच होवु शकत नाही आणि ती व्यक्ति म्हणजे कवी कलश. खरे तर कवी कलशांना बखरकारांनी खुपच बदनाम केलेले दिसते.शिवाजीराजांच्या अभिषेकासाठी महाराष्ट्रातील एकही भट ब्राह्मण पौरोहित्य करण्यास तयार झाले नाही. तेंव्हा राजांनी काशीवरुन गागा भट्टांना आणुन राज्याभिषेक पार पडला. सहाजिकच उत्तरेतील ब्राह्मणांबद्दल महाराष्ट्रातील ब्राह्मणांना राग होता व पुढे त्यांनी तो वेळोवेळी व्यक्त करत कवी कलशाचे बलिदान अडगळीत टाकुन त्यांना बदनाम करण्याची मोहिम सातत्याने चालुच ठेवली.संभाजी राजांनी औरंगजेबाशी होणार्या अखेरच्या लढाईची योजना बनविण्यासाठी संगमेश्वर येथे जी निवडक लोकांची बैठक घेतली त्यात कवी कलशही जातीने हजर झाले होते. संभाजी राजांबरोबर लढता लढता तेही कैद झाले होते.संभाजी राजांवर जो अमानुष प्रयोग केला जायचा त्याची रंगीत तालीम औरंग्या कवी कलशांवर करायचा जेणेकरुन कवी कलशांचे हाल पाहुन संभाजी राजे गहीवरुन शरण येतील परंतु जीवलग मित्रांना वेगळे करुन पाहिले, आमिषे दाखविली व शेवटी अनेक अन्वित अत्याचार केले गेले प्रसंगी जीव दिला परंतु कवी कलशांनी महाराष्ट्राशी व स्वराज्याशी व संभाजी राजांशी ईमान राखत आपल्या देहाचे बलिदान याच महाराष्ट्राच्या भुमीवर संभाजी राजांच्या अगोदर दिले. संभाजी राजांबरोबर एवढ्या हाल अपेष्टा भोगणारा प्रत्यक्ष मृत्युलाही सामोरे जाणार्या कवी कलशांचा हा महाराष्ट्र नेहमीच ऋणी राहील.

◆ पान ४ वरून पुढे...

## देव देश आणि...

तथा श्री सोमेश्वर हनुमान महादेव मंदिर फाउंडेशनचे मा श्री अध्यक्ष नवनाथ जी अण्णा शिराळे पाटील यांच्या आदेशावरून महाराष्ट्र राज्य लोकशाही पत्रकार संघाचे सर्वे सर्वा मा श्री संस्थापक अध्यक्ष साहेब व लोकशाही पत्रकार संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष सौ सुनंदाताई केदार लेडी सिंघम यांच्या हस्ते व प्रमुख प्रशासकीय मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये हा पुरस्कार देऊन नगरसेवक तथा ॲड. गोविंद शिराळे पाटील यांना सन्मानित करण्यात आले यावेळी येथे उपस्थित असलेले लोकशाही पत्रकार संघाचे मराठवाडा कार्याध्यक्ष आत्माराम जी वावळकर सर तसेच बीड जिल्हा वाहतूक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर साहेब तसेच त्यांचे सहकारी मुंडे साहेब शिंदे साहेब गाडे साहेब व लेडी सिंघम वाहतूक शाखेच्या शेख मॅडम तसेच लोकशाही पत्रकार संघाचे जिल्हा संघटक संजय देवा कुलकर्णी कुक्कडगावकर प्रकाश गाडे पत्रकार किशोर कुलकर्णी लोक लाडक्या बियांचे बाजीराव ढाकणे साहेब तसेच पत्रकार संघाचे सर्व पदाधिकारी व बीड शहरातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते तेव्हा लोक रत्न पुरस्कार सोहळा मोठ्या आनंदामध्ये आणि थाटामाटा मध्ये संपन्न झाला एडवोकेट गोविंद शिराळे पाटील बीडचे स्वीकृत नगरपालिकेचे नगरसेवक यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील उत्कृष्ट कार्यास सर्वांच्या वतीने मनस्वी शुभेच्छा देण्यात आल्या.

## ह.भ.प. ज्ञानेश्वरी...

ग्रंथ शिकवतो त्यामुळे प्रत्येक सर्व सामान्य भाविकांनी यातुन ज्ञान घेतले पाहिजे. अजून महाराज खाडे कीर्तनात म्हटले की, डॉक्टरांनी कितीक वेळा मला आराम करण्याचा सल्ला दिला परंतु मी डगमगलो नाही ज्ञानेश्वरी माझ्या पाठीमागे खंबीरपणे उभी असायची माझ्या मुखात रोज ज्ञानेश्वरी चे नाव असायचे त्यामुळे माझ्या दुखणं, आजर पळून गेला या ज्ञानेश्वरी मुळे माझ्या जीवनाच सार्थक झाल्याचा आनंद आहे असे काल्याचे कीर्तनात ह.भ.प. अर्जुन महाराज खाडे यांनी संबोधित केले. काल्याच्या कीर्तनानंतर महाप्रसादाचे आयोजन स्व. हिरालाल पन्नालाल नहार व स्व. सुरजबाई हिरालाल नहार यांच्या पुण्यस्मरणार्थ वडवणी शहरातील प्रसिध्द उद्योजक प्रतिष्ठित व्यापारी माणिकचंद हिरालाल नहार यांजकडून महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. वडवणी पंचक्रोशीतील सर्व भाविक भक्तांनी महाप्रसादाचा मोठ्या संख्येने लाभ घेतला.

या कार्यक्रमासाठी विशेष सहकार्य सर्व पत्रकार बांधव लाभले असल्याचे महाराजांनी सांगितले व अर्जुन महाराज खाडे यांच्या उपस्थित वडवणी तालुका पत्रकार संघाचा सत्कार समारंभ संपन्न झाला.या कीर्तन महोत्सवाचे नेतृत्व कीर्तनकार ह.भ.प सौ.गीताताई खाडे–भांगे यांनी योग्य रित्या पार पाडले.

◆ पान ४ वरून पुढे...

## पाटोद्यात मंथन....

असल्याची भावना पालकांनी व्यक्त केली.भविष्यात अशा परीक्षांचे आयोजन करताना विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसह बसण्याच्या सुविधांची योग्य व्यवस्था करावी या प्रकरणाची शिक्षण विभाग व परीक्षा आयोजकांनी चौकशी करून कारवाई करावी अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

## कंटिन्यूअस प्रोफेशनल...

करून कौशल्यवृद्धी करणे व बदलत्या जगासोबत जुळवून घेणे आवश्यक असल्याचे मत वक्त्यांनी व्यक्त केले. नर्सिंग व्यवसाय हा केवळ सेवा नसून उज्ज्वल करिअर संधी देणारे क्षेत्र असल्याचे सांगत, अशा सातत्यपूर्ण प्रशिक्षण व व्यावसायिक विकास कार्यक्रमांमुळे नर्सिंग कर्मचाऱ्यांचा आत्मविश्वास, कार्यक्षमता व गुणवत्ता वाढते, असेही यावेळी नमूद करण्यात आले. या कार्यक्रमामुळे उपस्थित नर्सिंग व्यावसायिकांना नवे ज्ञान, अनुभव व दिशा मिळाल्याची भावना व्यक्त करण्यात आली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल आयोजक कृष्णाई इन्स्टिट्यूट ऑफ बी.एससी. नर्सिंग व महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलचे सर्वत्र कौतुक करण्यात आले.

## शेतकरी व पशुधन...

आपत्तीच्या काळात अडकलेल्या पशुधनाचा सुरक्षित, वेदनारहित व प्रभावी पद्धतीने बचाव करण्यासाठी विशेष उपकरणाची रचना करण्यात आली आहे. सदरील उपकरणामुळे पशुधनाला इजा न होता त्यांना नियंत्रित करणे व आपत्कालीन परिस्थितीत तात्काळ सुटका करणे शक्य होणार आहे.आपत्ती व्यवस्थापनाच्या वेळी पशुधन वाचवताना पशुपालक, पशुवैद्यक व बचाव पथकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. अशा वेळी हे अभिनव उपकरण अत्यंत उपयुक्त ठरणार असून शेतकरी, पशुसंवर्धन विभाग, आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा व स्वयंसेवी संस्थांसाठी हे संशोधन मोलाचे ठरेल, असा विश्वास तज्ज्ञांकडून व्यक्त केला जात आहे. या संशोधनास भारत सरकारच्या पेटंट कार्यालयाकडून डिझाइन नोंदणी मिळाल्यामुळे रोहित चव्हाण याच्या कार्याची अधिकृत दखल घेण्यात आली आहे. विशेष म्हणजे ग्रामीण भागातील तरुण विद्यार्थ्याने व्हेटरनरी शिक्षणादरम्यान असे नाविन्यपूर्ण संशोधन करून राष्ट्रीय स्तरावर ओळख निर्माण करणे ही अभिमानाची बाब मानली जात आहे. दरम्यान शेतकरी हितासाठी व पशुधन संरक्षणासाठी असे संशोधन भविष्यात क्रांतिकारी बदल घडवेल, असा विश्वास गावरान ॲग्रो प्रोड्यूसर कंपनी लिमिटेड, गेवराईचे अध्यक्ष भाऊसाहेब लवटे, यांनी यावेळी व्यक्त केला. रोहित चव्हाण याच्या या यशामुळे गेवराई तालुक्यासह बीड जिल्ह्याच्या शैक्षणिक व संशोधन क्षेत्रातील प्रतिष्ठेत भर पडली असून भविष्यात त्यांच्या संशोधनाचा प्रत्यक्ष वापर शेतकरी व पशुपालकांसाठी दिलासादायक ठरणार आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल रोहित राजेंद्र चव्हाण याचे सर्वस्तरातून अभिनंदन होत असून पुढील संशोधन कार्यासाठी शुभेच्छा देण्यात येत आहेत.

◆ पान १ वरून पुढे...

## केंद्रीय अर्थसंकल्प....

काही वस्तूंचा संदर्भ देत त्या म्हणाल्या की, चामडे आणि कापडांची निर्यात देखील शुल्कमुक्त असेल आणि या वस्तूंवरील सीमाशुल्क कमी केले जात आहे. संरक्षण क्षेत्रात मूलभूत सीमाशुल्क माफ केले जातील.

## अर्थसंकल्पानंतर....

दरम्यान, सेन्सेक्स २३७० अंकांनी घसरून ७९८९९ या दिवसाच्या नीचांकी पातळीवर पोहोचला. निफ्टी देखील ७५० अंकांनी घसरून २४,५७१ च्या नीचांकी पातळीवर पोहोचला. अर्थसंकल्पीय भाषणादरम्यान: सेन्सेक्स १६०० अंकांनी किंवा २ टक्क्यांनी घसरून ८०६०० वर पोहोचला. निफ्टी देखील सुमारे ५५० अंकांनी घसरून २४,८०० वर पोहोचला. अर्थसंकल्पीय भाषणापूर्वी: सकाळी ९:१५ वाजता, सेन्सेक्स १०० अंकांनी घसरून ८२,१५६ वर उघडला. निफ्टी देखील सुमारे ५० अंकांनी घसरून २५,२७५ वर उघडला. STT, किंवा सिक्युरिटीज ट्रान्झॅक्शन टॅक्स, हा शेअर बाजारातील प्रत्येक खरेदी किंवा विक्रीवर आकारला जाणारा थेट कर आहे. तुम्हाला तोटा झाला तरीही तुम्हाला हा कर भरावा लागतो. तो तुमच्या व्यवहार मूल्यातून थेट वजा केला जातो आणि स्टॉक एक्सचेंजद्वारे सरकारकडे जमा केला जातो. वाढलेल्या कर दरांमुळे, आता तुम्हाला एका व्यवहारासाठी पूर्वीपेक्षा जास्त पैसे द्यावे लागतील. ऑप्शन प्रीमियम आणि एक्सरसाइजवरील कर देखील वाढले. १. ऑप्शन प्रीमियमवरील कर: जेव्हा तुम्ही एखादा ऑप्शन खरेदी किंवा विक्री करता तेव्हा तुम्ही भरलेल्या किंमतीवरील (प्रीमियम) कर आता वाढला आहे. २. ऑप्शन एक्सरसाइजवरील कर: ऑप्शन कॉन्ट्रॅक्टचा वापर केल्यानंतर डिलिव्हरी घेण्यावर किंवा देण्यावर कर देखील वाढवण्यात आला आहे. गुंतवणूकदारांवर त्याचा काय परिणाम होईल? व्यापार अधिक महाग होईल: एसटीटीमध्ये वाढ केल्याने पर्यायांमध्ये व्यापार थोडा महाग होईल, कारण तुम्हाला सरकारला पूर्वीपेक्षा जास्त कर भरावा लागेल. नफ्यावर परिणाम: करात वाढ केल्याने तुमचा निव्वळ नफा किंचित कमी होईल आणि जर तुम्हाला तोटा झाला तर तो करामुळे थोडा वाढेल.

## 'तेराव्या दिवशी....

पवारांसोबत काय चर्चा झाली? या सगळ्या प्रक्रियेत मी होतो. तेरा दिवसांनी मी सर्व सांगेल, असे रोहित पवार म्हणाले. मी पत्रकार परिषद घेऊन त्या संदर्भात सांगेल. १३ दिवस ज्यादिवशी होतील, त्या दिवशी मी सांगेन. आता राजकीय बोलणे योग्य नाही, असे रोहित पवारांनी म्हटले. शपथविधीला पवार कुटुंब अनुपस्थित का? सुनेत्रा पवार यांचा शपथविधी होणार हे कोणाला माहीत नव्हते. लाखो लोक बारामतीमध्ये पवार कुटुंबाला भेटण्यासाठी येत होते. पार्थ देखील होता. संपूर्ण महाराष्ट्र येऊन भेटत नाही सत्वन करत नाही तोपर्यंत आपण बारामतीत थांबले पाहिजे. आम्हाला शपथविधीची बातमी देखील टीव्हीच्या माध्यमातून कळाली, असे रोहित पवार म्हणाले. रोहित पवारांची दादांसाठी भावनिक पोस्ट– ''मा. अजितदादांनी जिथं विकासरुपी फुलांची बाग फुलवली तिथंच त्यांची राख सावडण्याची वेळ येईल, असं कधी स्वप्नातही आलं नाही.. पण नियतीच्या क्रूर खेळापुढं कुणाचं काही चालत नाही.. अजितदादांची ती दुर्दैवी बातमी आल्यापासून अद्यापपर्यंत डोकं सुन्न आहे मन बर्फाप्रमाणे थिजलंय.. काय झालं, कसं झालं आणि का झालं, या विचाराचं मनातलं काहूर थांबत नाहीय आपल्यात आत्तापर्यंत जे–जे काही संभाषण झालं, चर्चा झाल्या, विशेषतः शेवटच्या काही दिवसांमध्ये झालेल्या भावनिक चर्चा, हे सगळं काही एखादा टेपरेकॉर्डप्रमाणे सारखं सारखं कानात घुमतंय. जणू काही तुम्हीच अदृश्य स्वरुपात बोलत आहात असा भास होतोय. तुमची ती काम करण्याची शैली, प्रशासनावर पक्की मांड, राजकारणावर मजबूत कमांड, परखड स्वभाव, हो ला हो आणि नाही ला नाही न करता जे असेल ते स्पष्ट सांगून समोरच्या व्यक्तीसोबत राजकारण न खेळण्याची पद्धत, कामाचा झपाटा, वेळेचं काटेकोर नियोजन या सगळ्याचं आम्हाला अक्षरशः कौतुक आणि आश्चर्यही वाटायचं. सत्ता असो किंवा नसो, कायम तुमचा दरारा वाटायचा, आदरयुक्त भिती असायची. तुमचा सार्वजनिक वावर बघून तुम्हाला न भेटलेल्या अनेकांना तुम्ही फणसाप्रमाणे कठोर वाटायचात पण तीच व्यक्ती जेंव्हा तुमच्या संपर्कात यायची तेंव्हा फणासातील रसाळ आणि मधुर गऱ्याप्रमाणे तुमचा स्वभाव पाहून ती तुमच्या प्रेमात पडायची, याचे आम्ही साक्षीदार आहोत.'

◆ पान १ वरून पुढे...

## संत गजानन...

महाराज मंदीर परिसरात भव्य मंडप उभारण्यात आला असून दररोज पहाटे अभिषेक, भजन, सायंकाळी महाआरती, पद्यपुजा, श्रीसुक्त हवन, जयमहेश सुंदरकांड, तसेच श्री गजानन विजय ग्रंथ सामुहिक पारायण होणार असून दि. ८ रोजी प्रगटदिनी पहाटे ४.३० वाजता, लघुरूद्राभिषेक होवून दुपारी १२ वाजता प्रगटदिन महाआरती होणार आहे. त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. भाविकांच्या सेवेतून जिर्णोध्दाराचे काम पूर्ण झाले असून मंदीरामध्ये गणनायक, गणेशा, गुरूनायक दत्तप्रभु, राम पंचायत आदीची स्थापना करण्यात आली असून लवकर आदीदेव महादेवच्या पिंडीची स्थापना होणार आहे. प्रगटदिन सोहळ्याचा भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन श्री गजानन महाराज सांस्कृतिक मंडळ, सहयोगनगर,बीड यांनी केले आहे.

## अजितदादा लोकांच्या...

नाही. अशा शोकभावना व्यक्त करून शोकाकुल वातावरणात अंबाजोगाई येथे लोक विकास महाआघाडीचे नेते राजकिशोर मोदी यांच्या पुढाकाराने शुक्रवारी सर्वपक्षीय शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते.

शहरातील वेणुताई चव्हाण महिला महाविद्यालयाच्या भव्य प्रांगणात, अंबाजोगाई बस स्टॅण्ड समोर शुक्रवार, दिनांक ३० जानेवारी रोजी सर्वपक्षीय शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी बोलताना माजी आमदार संजय दौंड यांनी आपले स्वअनुभव कथन केले. ते उत्तम राजकारणी तर होतेच, पण मनाने शेतीनिष्ठ शेतकरीही होते. दादा मातीशी जुळलेले नेतृत्व होते असे त्यांनी सांगितले. तर माजी आमदार पृथ्वीराज साठे यांनी आपले स्वअनुभव कथन केले. दादा हे शिव–फुले–शाहू–आंबेडकरी विचारांचे पाईक होते. प्रत्येक कार्यकर्त्याला सन्मान देणारे, ग्रामीण भागाच्या प्रश्नांची जाण असणारे नेते होते असे माजी आ.साठे म्हणाले. प्रदेश उपाध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी सांगितले की, दादांची प्रशासनावर पकड होती. कार्यकर्त्यांना बळ देणारे, नियमांनुसार प्रत्येकाचे काम करणारे, शिस्तप्रिय, सर्वांना सोबत घेऊन चालणारे, विकासाचा दृष्टिकोन जोपासणारे नेतृत्व म्हणून दादांकडे पाहता येईल. दादांच्या समाजसेवेचा वारसा आपण जोपासू असे मोदी म्हणाले. राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार गट) चे जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण यांनी दादा हे सर्वांना आपले वाटावे असे विकासप्रिय नेतृत्व होते. त्यांचे स्वप्न आपण सर्वजण एकत्र येऊन पुर्ण करू असे चव्हाण म्हणाले. भाजपा नेते अक्षय मुंदडा यांनी आपले स्वअनुभव कथन केले. दादांनी कर्तव्यनिष्ठा, शिस्त जोपासत प्रामाणिकपणे काम केले. दादांचे पद कोणीही घेईल पण, त्यांची जागा कोण घेणार असा प्रश्न मुंदडा यांनी उपस्थित केला. डॉ.नरेंद्र काळे यांनी दादा गेले यावर अजूनही विश्वास बसत नाही. पक्ष एक होत असताना दादांचे जाणे दुर्दैवी असल्याचे डॉ.काळे म्हणाले. दत्तात्रय पाटील यांनी दादांविषयीचे आपले स्वअनुभव कथन केले. उपनगराध्यक्ष दिनेश भराडीया यांनी दादा हे असे एकमेव नेते होते ज्यांनी आपल्या कामातून ते कामाचा माणूस आहेत हे सिद्ध केले असे भराडीया यांनी सांगितले. नगरसेवक बबनराव लोमटे यांनी दादांनी बीड जिल्ह्याला शिस्त लावली. ते सर्व विषयांत पारंगत होते असे सांगितले. सतिश लोमटे यांनी दादांविषयीचे आपले स्वअनुभव कथन केले. सर्वधर्मसमभाव जोपासणारे नेतृत्व म्हणून दादांकडे पाहता येईल असे ते म्हणाले. यावेळी ज्येष्ठ संपादक अशोकराव गुंजाळ, कॉ.बब्रुवाहन पोटभरे, रामभाऊ कुलकर्णी, ॲड.अनंतराव जगतकर, डॉ.डी.एच.थोरात, गणपत व्यास, महेंद्र निकाळजे, दगडू लोमटे, ॲड.शिवाजी कांबळे, प्रा.रोहिणी पाठक, डॉ.सुलभा पाटील, ज्येष्ठ पत्रकार सुदर्शन रापतवार, शाहेबाज मणियार, हाजी खालेक कुरेशी, गणेश देवकते, श्रीधर गरड, डॉ.राजेश इंगोले, ॲड.अजित लोमटे, बालासाहेब दोडतले, व्यंकटेश चामनर, ॲड. इस्माईल गवळी यांनी आपल्या सहवेदना शोकभावना व्यक्त केल्या. यावेळी नगरपालिका, अंबाजोगाई सहकारी साखर कारखाना, अंबाजोगाई कृषी उत्पन्न बाजार समिती, ज्येष्ठ नागरिक संघ, रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी, केज विधानसभा मतदार संघ, मराठवाडा जनता विकास परिषद, मराठवाडा साहित्य परिषद, कुणबी विकास मंच, अंबाजोगाई पिपल्स बँक, श्री योगेश्वरी नागरी सहकारी पतसंस्था, श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ, क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले महिला नागरी सहकारी पतसंस्था, मेडिकल प्रॅक्टिशनर्स असोसिएशन, इंडियन मेडिकल असोसिएशन, मराठी पत्रकार परिषद वैद्यकीय कक्ष, वकील संघ, ज्ञानदीप शिक्षण प्रसारक मंडळ,

◆ पान १ वरून पुढे...

स्व.भागवानराव लोमटे बापू कुटुंबिय, वेणूताई चव्हाण प्रतिष्ठान, योगेश्वरी शिक्षण संस्था, येल्डा पंचक्रोशी, यशवंत सेना, भारतीय शिक्षण प्रसारक संस्था, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, डेंटल कौन्सिल परिषद महाराष्ट्र राज्य, बनेश्र्वर शिक्षण संस्था, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार गट), राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी (अजित पवार गट), भारतीय जनता पक्ष, समाजवादी पार्टी, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गट, शिवसेना शिंदे गट, शिवसेना (उबाठा), मुस्लिम समुदाय यांच्या तर्फे ३१ जणांनी आपल्या लोकभावना व्यक्त केल्या. शोकसभेचे सुत्रसंचालन कवी भागवत मसने यांनी केले. तर त्यांना मुख्याध्यापक आनंद टाकळकर यांनी सहकार्य केले. शोकसभेला राजपाल लोमटे, राजेभाऊ औताडे, अमर देशमुख, नगरपरिषद गटनेते सय्यद ताहेरभाई, नगरसेवक महेश लोमटे, नगरसेवक आकाश कराड, नगरसेवक महेश कदम, नगरसेवक संभाजी जावळे, नगरसेवक प्रतिनिधी अकबर पठाण, अमोल लोमटे, सचिन जाधव, जावेद गवळी, प्रकाश सोळंकी, प्रा.वसंतराव चव्हाण, विशाल जाजू, पुरूषोत्तम चोकडा, दिलीप काळे, मनोज लखेरा, खालेद चाऊस, सुनिल वाघाळकर, अशोक जेधे, गणेश मसने, कचरूलाल सारडा, ताराचंद शिंदे, बाळासाहेब सोनवणे, शेख मुख्तार, सय्यद रशीदभाई, मदनलाल परदेशी, कल्याण भिसे, राजेंद्र मोरे, प्रा.शैलेष जाधव, सुहास मोहिते, सुशीलकुमार वाघमारे, अंकुश हेडे, पंडित हलगुंडे, कृष्णा लोमटे, अनिस मोमीन, सि.व्ही.गायकवाड, रूपेश चव्हाण, सिध्दु लोमटे, सुभाष बाहेती, अशोक हेडे, शंकर भिसे, सुभाष पानकोळी, संजय कोंबडे, ईश्वर शिंदे, वसंतराव मोरे, तारेखअली उस्मानी, दत्ता देवकते, रणजित मोरे, अंगदराव तट, राजू अन्सारी, विजय रापतवार, डॉ.वनमाला रेड्डी, संजीवनी देशमुख, चंद्रकला देशमुख, उषा यादव, अनिल पसारकर, डॉ.धर्मपात्रे, तानाजी देशमुख, सुहास चंदनशिव, देविदास जाधव, रवि देशमुख, पत्रकार अविनाश मुडेगावकर, प्रकाश लखेरा, अभिजीत गाठाळ, रणजित डांगे, दत्तात्रय अंबेकर, संजय जोगदंड, नईम सय्यद, संभाजी मस्के आदींसह अंबाजोगाईतील राजकीय, सामाजिक, स्वयंसेवी, शिक्षण, वैद्यकीय, विधी, शेती, सहकार, साहित्य, संगीत, पत्रकारीता, कला, नाट्य, सांस्कृतिक, क्रीडा, व्यापार, उद्योग आदींसह विविध क्षेत्रातील मान्यवर, सर्वपक्षीय नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि दिवंगत अजितदादा पवार यांच्यावर प्रेम करणारे नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ऊस तोडणीसाठी....

काळे आणि राहुल विलास काळे हे पारधी समाजातील दोन तरुण नागझरी येथील ऊसतोड मुकादम सोबत पश्चिम महाराष्ट्रातील पुणे जिल्ह्यातील बारामती जवळ असलेल्या सोमेश्वर सहकारी साखर कारखाना येथे ऊस तोडणीसाठी गेले होते. दि. ३० जानेवारी, शुक्रवार रोजी त्या दोघांना एका पिक–अप मधून अज्ञात ठिकाणी घेऊन जात सुमारे १० ते १२ लोकांनी त्यांना अमानुष व बेदम मारहाण केली. बेदम मारहाण झाल्या नंतर श्रावण महादेव काळे, राहुल विलास काळे हे त्यांच्या केज तालुक्यातील केवड या ऊस तोडणीसाठी गेलेल्या गावी आले. त्या नंतर दि. ३१ जानेवारी रोजी ते अशिक्षित असल्या कारणाने त्यांना झालेल्या मारहाणीची माहिती देण्यासाठी ते दोघे त्यांच्या नातेवाईक सोबत केज येथील पोलिस ठाण्यात आले आहेत. मात्र सदरील मारहाणीची घटना केज पोलिस ठाणे हद्दीच्या बाहेर आणि जिल्ह्या बाहेर असल्या कारणाने गुन्हा नोंदवून घेण्या संदर्भात अडचणी येत आहेत. सदर मारहाण झालेल्या युवकांशी आणि त्यांच्या कुटुंबाशी संपर्क साधला असता त्यांनी ऊसतोड मुकादम यांनी त्यांना एका वाहनाने धाराशिव जिल्ह्यातील ढोकी येथील साखर कारखान्याच्या परिसरात आणून रात्री बेदम मारहाण केली असे सांगितले आहे. तर ऊस तोड मुकादमाशी संपर्क साधला असता तो म्हणत आहे की, या मारहाणीशी त्याचा संबंध नसून त्या दोघांना त्यांच्या जात पंचायती मध्ये मारहाण झाल्याचे सांगत आहे.

## बीड जिल्ह्याने....

कार्यालयात सर्वपक्षिय शोकसभेचे आयोजन करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी अजितदादांच्या आठवणी जागवल्या. अतिशय शोकाकुल वातावरणात अजितदादांना उपस्थितांनी आदरांजली अर्पण केली. यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित, जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण, माजी आमदार भिमराव धोंडे, बाळासाहेब आजबे, उषाताई दराडे, संजय दौंड, राजेंद्र जगताप नगराध्यक्षा प्रेमलता

◆ पान १ वरून पुढे...

पारवे, सुशीलाताई मोराळे यांच्यासह सर्व राजकीय पक्षांचे नेते, विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थितांनी स्व. अजित दादा पवार यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांना श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी सर्वपक्षिय नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच अजित दादा पवार यांच्यावर प्रेम करणारे नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविक भाषणात राष्ट्रवादी कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष ड राजेश्वर चव्हाण म्हणाले की, सर्वांना सोबत घेऊन काम करताना शिव–शाहु– फुले– आंबेडकर विचाराला कधी दादांनी बगल दिली नाही, त्यांचे अकाली जाणे सर्वांना वेदना देऊन गेले होते. बीडला बारामती करण्याचा निर्धार केला होता. त्यांनी तसा शब्द दिला होता. उमेदीच्या काळात एक सक्षम नेतृत्व हरपले आहे. सुनेत्राताई उपमुख्यमंत्री झाल्या आहेत तेव्हा एकजुटीने पुन्हा हा विकास पुढे घेवून जाऊ. दादांच्या स्वप्नातला हा बीड जिल्हा निर्माण करुया असे त्यांनी सांगितले. यावेळी बोलताना राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित म्हणाले की, दादा आपल्यात नाहीत हे अजूनही मनाला पटत नाही, दादा बीडचे पालकमंत्री झाले आहेत, आपल्या बीड जिल्ह्याचे चित्र बदलणार असे सर्व सामान्य जनतेला वाटत होते पण नियतीने दादांना हिरावून नेले आहे, त्यामुळे खुप नुकसान झाले आहे. शेवटच्या घटकाच्या घरापर्यंत अवकळा पसरली आहे, आपला माणूस गेल्याची भावना प्रत्येक माणसाची आहे. दादा केवळ पहिल्या बाकावरच्या आमदारांचे नव्हते तर ते शेवटच्या बाकावर बसणा–या कार्यकर्त्यांच्या हिताचा विचार करणारे होते. महाराष्ट्राचा राजकीय इतिहास जेंव्हा लिहिला जाईल तेव्हा दादांना वगळून हा इतिहास लिहिला जाऊ शकत नाही, दादा हे या शतकाचे जननायक आहेत. तत्वाशी तडजोड न करणारा नेता आपल्यातून गेला हे अतिशय वाईट झाले आहे. दादा गेल्याचे दुःख मलाच नाही तर प्रत्येक सामान्य माणसाला आहे. बीड जिल्ह्यातील आम जनतेने पाहिलेले स्वप्न सुनेत्रा ताईंच्या रुपाने होईल. राष्ट्रवादी कॉंग्रेसचे ओबीसी सेलचे कल्याण आखाडे म्हणाले की, दिलेला शब्द पाळणारा नेता म्हणून अजितदादांची ओळख महाराष्ट्रभर होती. विकासाभिमुख नेतृत्व म्हणून दादा सर्वपरिचित होते. मोठी संधी दादामुळे मला मिळाली. सामाजिक कार्यकर्त्या सुशिलाताई मोराळे म्हणाल्या की, आम्हाला दादा का भावले तर दादांनी आम्हाला कधीच अंतर दिले नाही. आमच्या सुख दुःखात धाऊन आले. दादांचे बीडचे आपुर्ण राहिलेले स्वप्न पूर्ण करु. माजी आमदार बाळासाहेब आजबे म्हणाले की, दादांच्या लाखो आठवणींने आमच्या मनात गर्दी केली आहे. दादा कामाचा माणूस होते. आपल्या जिल्ह्याला असा माणूस पालकमंत्री म्हणून मिळाले होते, पण त्यांचे जाणे आपल्यासाठी दूर्देव आहे. माजी आमदार उषाताई दराडे, अजितदादा हे शरद पवार साहेबांच्या कुशित तयार झालेले व्यक्तिमत्व होते. दादा सारखे नेतृत्व पुन्हा घडावे, त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून पुढे काम करावे. माजी आमदार भिमराव धोंडे म्हणाले की, अजितदादांचे कृषी, सिंचन, शिक्षण, समाज, राजकारण असे सर्व क्षेत्रात भरीव काम आहे. अजितदादांची जागा भरुन काढण्याचे काम करावे. माजी आमदार राजेंद्र जगताप म्हणाले की, सर्वांना समान न्याय देण्याचे काम दादांनी केले. सिंचनाच्या बाबतीत आणि महाराष्ट्र सुजलाम सुफलाम करण्यासाठी दादांनी आपले जीवन अर्पण केले. या मातीशी नाते तोडून, कार्यकर्त्यांना सोडून का गेलात... दादा परत या...परत या... अशा ओळी त्यांनी सादर केल्या. माजी आमदार संजय दौंड म्हणाले की, दादांच्या जाण्याने महाराष्ट्राची प्रचंड हानी झाली आहे. जशी बारामती उभी केली तसे मला बीडला उभे करायचे आहे, असा शब्द दादांनी दिला होता. आपण सर्वांनी आता अजितदादा यांचा वादा पुर्ण करावयाचा आहे. नगरसेवक अमर नाईकवाडे म्हणाले की, अजितदादा हा नेता आम्हाला त्यांच्या कार्यकर्तृत्वाने भावला. त्यांच्या विचाराने आपण यापुढे काम करु. उपनगराध्यक्ष विनोद मुळूक म्हणाले की, दादांच्या कामाचा उरक आणि स्पष्टवक्तेपणा हे गुण आम्ही अंगिकारु, जेष्ठ नगरसेवक मोईन मास्टर म्हणाले की, सर्व समाजाला सोबत घेऊन काम करणारे, अन्यायाला वाचा फोडणारे अजितदादा एक हिरा होते, तो हिरा आता आपल्यातून हरपला आहे. दादांचे कार्य आपण सर्वांनी पुर्ण करावे. राष्ट्रवादी कॉंग्रेसचे पक्षाच्या वतीने दादासाहेब मुंडे म्हणाले की, ६५ वर्षांच्या महाराष्ट्रात ६६ वर्षांचा उपमुख्यमंत्री अजितदादांनी अर्थमंत्र्यांची यशस्वी परंपरा पुढे नेली. सिंचन क्षमता वाढली पाहिजे त्यामुळे शेतीचा विकास होणार हा विचार करणारे अजितदादा आज आपल्यात नाहीत, त्यामुळे आपले खुप मोठे नुकसान झाले आहे. त्यांनी दिलेला संदेश आणि विचार घेऊन आपण पुढे जावूया.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# किसान बाबा व नवनाथ बाबा सारखे संत कृपावंत असतात: ह भ प गोविंद महाराज नाईकवाडे

## श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे २८ व्या वर्षातील सहावी पुण्यतिथी ; मन्यारवाडी ग्रामस्थानची महाप्रसाद पंगत संपन्न



**बीड । प्रतिनिधी**

विसाव्या शतकातील महान संत सद्गुरु वैकुंठवासी किसन बाबा महाराज यांच्या २८ व्या वर्षाच्या सहाव्या पुण्यतिथी निमित्त मघ शुद्ध पौर्णिमे दिवशी श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे ह भ प गोविंद महाराज नाईकवाडे यांचे सुश्राव्य असे कीर्तन संपन्न झाले.आई वडील वेद देव हे व्यक्तीवर मर्यादित कृपा करतात आई वडील फक्त आपल्या मुलावर प्रेम करते व हे प्रेम मुलं आपल्याला सांभाळतील या हेतू करिता असते तसेच वेद हे ज्ञानग्रहण करणाऱ्या वर प्रेम करतात व देव हा फक्त आपल्या भक्तांवर प्रेम करतो राक्षसांना यमसाधनी पाठवण्याचं काम करतात परंतु संत हे अमर्याद प्रेम करतात भेदभाव न करता सर्वांवर अमर्याद प्रेम करणारे संत हे कृपावंत आहेत देव आई वडील व वेद कृपाशीला आहेत परंतु सर्वांवर प्रेम करणारे संत फक्त कृपावंत आहे गुरुवर्य वैकुंठवासी किसन बाबा महाराज व गुरुवर्य शांती ब्रह्म नवनाथ

**गुरुवर्य शांती ब्रह्म नवनाथ बाबा महाराज हे आपल्या गुरुची आठवण म्हणून गुरुवर्य किसन बाबा महाराज यांची पुण्यतिथी म्हणून गेल्या २७ वर्षापासून प्रत्येक पौर्णिमेला किर्तन व अन्नदानाची महापंगती आयोजन करतात**

बाबा महाराज असे संत सर्वांवर कृपा करतात म्हणूनच संतांना कृपावंत म्हणतात असे किर्तन विवेचनामध्ये ह भ प गोविंद महाराज नाईकवाडे यांनी भावार्थ किसन बाबा महाराज २८व्या वर्षातील सहाव्या पुण्यतिथी कार्यक्रमात व्यक्त केला. यावेळी श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी परिसरातील हजारो भावी भक्तांच्या उपस्थितीमध्ये पौर्णिमेनिमित्त कीर्तन सेवा टाळकरी विणेकरी मृदंग वादक माळकरी व भाविक भक्तांच्या उपस्थितीमध्ये पार पडला या माध शुद्ध पौर्णिमे निम्मित मन्यारवाडी ग्रामस्थांच्या वतीने अन्नदान पंगत करण्यात आली

# साई मंदिर संस्थान तलवाडा आयोजित अखंड हरिनाम सप्ताह श्रीमद् भागवत महापुराण कथा ज्ञानयज्ञ सोहळा संपन्न

## आजच्या काल्याचे किर्तन व तदनंतर समस्त भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घ्यावा – साई मंदिर सर्व पदाधिकारी

**तलवाडा । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील श्री साई मंदिर संस्थान या ठिकाणी श्रीमद् भागवत कथाकार भागवताचार्य रत्नप्रभाताई म. काळे वृंदावण धाम यांच्या मत्र मुग्ध वाणीने सुरवात. दैनिक कार्यक्रम : स.६ ते १० साईचरीत्र पारायण, दुपारी १ ते ४ श्रीमद् भागवत कथा. ५ ते ६ हरीपाठ, सायं. ८ ते १० हरिकीर्तन श्रीमद् भागवत कथाकार भागवताचार्य रत्नप्रभाताई म. काळे वृंदावण धाम सिंथवादक : सं.वि.ह.भ.प. सुरदास म. लाड (जळगाव), तबला विशारद : ह.भ.प. मल्हारी म. घनवट (पाथर्डी), पॅड वादक :- सोमनाथ म. तुपे, वैजापूर, कथा यजमान : श्री. शरद (भैय्या) खुरुद (युवानेते, तलवाडा) हरीपाठ नेतृत्व : गांवकरी महिला भजनी मंडळ, रविवार दि.२०/०१/२०२६ श्री. ह.



भ. प. नवनाथ महाराज तुपे (जापूर) सोमवार दि. २६/०१/२०२६ श्री.ह.भ.प. उमेश महाराज चव्हाण यमाई देवी सं. जातेगांव) मंगळवारदि.२७/०१/२०२६ श्री.ह.भ.प. बाजीराव महाराज काशिद (सा. पिंपरी, नारायणगड) बुधवार दि.२८/०१/२०२६ ह.भ.प.राधाताई महाराज कोल्हे (पंचवटी स. लुखाममला) गुरुवार दि.२९/०१/२०२६ श्री.ह.भ.प. किरण महाराज मोटे (आळंदी देवाची) शुक्रवार दि.३०/०१/२०२६ ह.भ.प. लक्ष्मीताई म. काळे (सिरसदेवी) शनिवार दि.३१/०१/२०२६ ह.भ.प. मनिषाताई म. चव्हाण (अंकुशनगर, महाकाळा) रविवार दि. १/२/२०२६ श्री ह.भ.प.शांतीब्रम्ह काशिनाथ महाराज यांचे दु. ११ ते १ काल्याचे किर्तन होईल तदनंतर महाप्रसादाचे आयोजन वाटप होऊन कार्यक्रमाची सांगता होणार आहे. समस्त भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घ्यावा आसे आव्हान साई ट्रस्टचे सर्व पदाधिकारी यांनी केले आहे.

# महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसच्या राज्य सचिवपदी ॲड. अविनाश सोळुंके यांची नियुक्ती

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसच्या राज्य सचिवपदी बीड जिल्ह्यातील रुईलिंबा येथील ॲड. अविनाश सोळुंके यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सदर नियुक्ती युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष मा. शिवराज मोरे यांनी अधिकृत आदेशाद्वारे जाहीर केली आहे.

शेतकरी कुटुंबातून आलेले व कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसलेले ॲड. अविनाश सोळुंके यांनी NSUI या विद्यार्थी संघटनेत मागील ८ वर्षे सातत्याने कार्य केले आहे. या कालावधीत त्यांनी NSUI महाराष्ट्रचे सरचिटणीस म्हणून जबाबदारी यशस्वीरीत्या पार पाडली. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, सामाजिक व न्यायहक्काशी संबंधित प्रश्नांवर त्यांनी प्रभावी भूमिका घेत अनेक आंदोलने, निवेदने व पाठपुरावे केले असून विद्यार्थ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. नियुक्ती संदर्भात आपली अधिकृत प्रतिक्रिया व्यक्त करताना ॲड. अविनाश सोळुंके यांनी नमूद केले की, ही नियुक्ती केवळ संघटनात्मक जबाबदारी नसून बेरोजगार विद्यार्थी, युवक तसेच वंचित व दुर्बल घटकांच्या हक्कांसाठी सक्षम व निर्णायक लढा देण्याची जबाबदारी आहे. केंद्र व राज्य सरकारच्या



चुकीच्या धोरणांमुळे वाढलेली बेरोजगारी, महागाई, शेती संकट व सामाजिक अन्यायाच्या विरोधात युवक काँग्रेस संघटनात्मक ताकदीने अधिक आक्रमकपणे रस्त्यावर उतरेल, असा ठाम निर्धार त्यांनी व्यक्त केला. सदर नियुक्तीचे महाराष्ट्रभर विद्यार्थी, युवक तसेच काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांकडून स्वागत व अभिनंदन व्यक्त करण्यात येत आहे.

# प्रभु विश्वकर्मा हे जगाचे निर्माणकर्ता – शामसुंदर महाराज कासापुरीकर

**माजलगांव । प्रतिनिधी**

प्रभु विश्वकर्मा भगवान यांच्या जयंतीनिमित्त माजलगांव शहराजवळील नवीन भाटवगाव येथील ज्ञानेश्वर नगर येथे विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमांतर्गत प्रसिद्ध कीर्तनकार शामसुंदर महाराज कासापुरीकरयांचे प्रेरणादायी कीर्तन दि. ३१ जानेवारी रोजी उत्साहात पार पडले. कीर्तनादरम्यान शामसुंदर महाराजांनी प्रभु विश्वकर्मा भगवान हे संपूर्ण विश्वाचे निर्माणकर्ता असून सृष्टीरचनेत त्यांचे अनन्यसाधारण



महत्त्व असल्याचे प्रतिपादन केले. त्यांनी प्रभु विश्वकर्मा भगवान यांचे जीवनकार्य, उत्पत्ती, त्याग, कर्तृत्व तसेच समाजासाठी दिलेले अमूल्य योगदान याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच समाजाने धर्मकार्यात एकत्र येऊन सामाजिक ऐक्य जपावे, व्यसनांपासून दूर राहावे, मोबाईल व इतर अपायकारक सवयी टाळाव्यात, असा मौलिक संदेश त्यांनी दिला. यासोबतच पर्यावरण संवर्धनासाठी झाडे लावा, झाडे जगवा तसेच व्यसनमुक्त जीवनशैली स्वीकारा अशी जनजागृतीही कीर्तनातून करण्यात आली. या कीर्तनप्रसंगी श्रीकृष्ण महाराज यादव, रमाकांत महाराज हरकाळ, बाबुराव म. रत्नपारखी, नारायण म. थोरात, शालवीताई चौधरी आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी परमेश्वर पांचाळ (आमसुले) होते.हा कार्यक्रम श्री विश्वकर्मा सुतार समाज संघटना व श्री विश्वकर्मा विठ्ठल-रुक्मिणी मंदिर प्रतिष्ठान, माजलगांव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता.कार्यक्रमास परिसरातील नागरिक, समाजबांधव व भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावून कीर्तनाचा लाभ घेतला.

# रासेयो शिबिरातून स्वच्छतेची जनजागृती; 'स्वच्छ गाव, सुंदर गाव' मोहिमेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**बीड । प्रतिनिधी**

देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी महाविद्यालय, बीड येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने मौजे शिवणी येथे सुरू असलेल्या सातदिवसीय विशेष श्रमसंस्कार शिबिरांतर्गत 'स्वच्छ गाव, सुंदर गाव' हा उपक्रम शुक्रवारी उत्साहात राबविण्यात आला. या उपक्रमात स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी गावातील रस्ते, सार्वजनिक ठिकाणे, शाळा परिसर तसेच विविध भागांची स्वच्छता करून ग्रामस्थांमध्ये स्वच्छतेबाबत जनजागृती केली.यावेळी विद्यार्थ्यांनी



सांडपाण्याचे योग्य व्यवस्थापन, कचरा वर्गीकरण तसेच परिसर स्वच्छ ठेवण्याचे महत्त्व ग्रामस्थांना समजावून सांगितले. विद्यार्थ्यांनी गावाजवळील नदी स्वच्छ करून जलसंवर्धनाचा संदेश दिला. नदी परिसरातील कचरा व गाळ काढून नदी स्वच्छ करण्याचा उपक्रम राबविण्यात आला. तसेच शोषखड्डे व पाझर खड्डे तयार करून पावसाचे पाणी जमिनीत मुरविण्याबाबतही जनजागृती करण्यात आली.ग्रामस्थांनीही विद्यार्थ्यांच्या या उपक्रमाचे कौतुक करत उत्स्फूर्त सहकार्य केले. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ.सुनील जोंधळे, प्रा. किशोर वाघमारे, प्रा.सुरेश वाघमारे, प्रा.श्वेता वंजारे, प्रा. वृषाली लोखंडे, प्रा. सुप्रिया ससाणे तसेच प्रा.रंजना जोगदंड यांचे मार्गदर्शन लाभले. महाविद्यालयाचे सर्व स्वयंसेवक मोठ्या संख्येने आणि उत्साहाने या मोहिमेत सहभागी झाले होते.

# मढी येथे आरोग्य शिबिर संपन्न



**पाथर्डी । प्रतिनिधी**

बाबुजी आव्हाड महाविद्यालयात ,राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विशेष हिवाळी शिबिर दिनांक २७ जानेवारी ते २ फेब्रुवारी २०२६ या कालावधीमध्ये मढी या ठिकाणी संपन्न होत आहे. या शिबिरामध्ये शुक्रवार दिनांक २९ जानेवारी २०२६ रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र शिरापूर यांच्या सहकार्याने आरोग्य विषयक शिबिर घेण्यात आले डॉ. मनोज केदार, सिस्टर अलका कोकणे, डॉ. महेश तुमाने यांच्या सहकार्याने हे आरोग्य शिबिर संपन्न झाले. या शिबिरामध्ये ८५ स्वयंसेवक स्वयंसेविका सहभागी झाले होते. त्यांचे हिमोग्लोबिन ,बीपी ,शुगर यांची तपासणी करण्यात आली. या शिबिरामध्ये डॉ.मनोज केदार यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक सेवकांना आरोग्य विषयक मार्गदर्शन केले. हे शिबिर यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ.अरुण राख, डॉ.वैशाली आहेर ,प्रा.आनंद घोंगडे यांनी परिश्रम घेतले. या शिबिरासाठी प्रा. शितल सानप, प्रा. साक्षी गुरुकुल, प्रा.संदीप कराड प्रा. खंडागळे सर उपस्थित होते.

# पाणलोट व्यवस्थापन आणि पडीक जमीन विकासासाठी युवकांचा सहभाग अनिवार्य : प्राचार्य डॉ.विजयकुमार बांदल

## तुलसी महाविद्यालयाच्या श्रमसंस्कार शिबिरात पाणलोट व्यवस्थापनावर डॉ.विजयकुमार बांदल यांचे मार्गदर्शन

**बीड । प्रतिनिधी**

युवकांनी शाश्वत विकास, पाणलोट व्यवस्थापन आणि पडीक जमिनीच्या विकासासाठी सक्रिय सहभाग नोंदवणे काळाची गरज असल्याचे प्रतिपादन गुरुकुल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयकुमार बांदल यांनी केले. तुलसी महाविद्यालय, बीड येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आयोजित विशेष श्रमसंस्कार शिबिरात शनिवार, दि. ३१ रोजी मौजे शिवणी येथे 'शाश्वत विकास, पाणलोट व्यवस्थापन व पडीक जमीन विकासासाठी युवा' या थीमखाली आयोजित सातदिवसीय विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या बौद्धिक सत्रात ते बोलत होते.

यावेळी कार्यक्रमाधिकारी प्रा. किशोर वाघमारे, प्रा. सुरेश



वाघमारे, प्रा. श्वेता वंजारे, प्रा.ऋषाली लोखंडे, प्रा. मगन ओव्हाळ तसेच अभय इंगोले उपस्थित होते. पुढे बोलताना डॉ.बांदल म्हणाले की, पाणलोट व्यवस्थापनामुळे जलस्रोतांची वाढ होऊन शेतीला मोठा फायदा होतो. पडीक जमिनीचा योग्य विकास केल्यास उत्पादनक्षमता वाढून ग्रामीण अर्थव्यवस्था सक्षम होण्यास मदत होते. विद्यार्थ्यांनी केवळ शैक्षणिक ज्ञानापुरते मर्यादित न राहता सामाजिक आणि पर्यावरणीय जाणीव ठेवून प्रत्यक्ष कृतीतून समाजासाठी योगदान द्यावे. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये श्रमसंस्कार, सामाजिक बांधिलकी आणि नेतृत्वगुण विकसित होतात, असेही त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. किशोर वाघमारे यांनी केले, तर आभार प्रा. सुरेश कसबे यांनी मानले. या प्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक, शिवणी येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये संत रविदास जयंती निमित्ताने अभिवादन



**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये संत रविदास यांच्या जयंतीनिमित्ताने उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी डॉ. अनंथा गाडे, माणिकराव आडे, सुरेश जोगदंड, संजय गुरव यांबरोबरच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थ्यांची उपस्थिती मोठ्या संख्येने होती.

दैनिक मराठवाडा पत्र दि. ०२/०२/२०२६

**टी.सी. हरवला आहे.**

रंजना सोपान घरत या नावाचा इयत्ता १२ वी विज्ञान पास चा टी. सी खर्डा ते वाशी या प्रवासामध्ये हरवला आहे. कोणाला सापडल्यास...

संपर्क मो.नं. ८२०८१ १०९०३ साधा.

दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

• संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे • जिल्हा विशेष • सोमवार, दि. ०२ फेब्रुवारी २०२६ •

## माजलगावात संत गुरु रविदास व संत कंकैय्या महाराज सार्वजनिक जयंती महोत्सव उत्साहात साजरा



माजलगाव । प्रतिनिधी

शहरामध्ये प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी संत रविदास महाराज व संत कंकैय्या महाराज सार्वजनिक जयंती महोत्सव ०१ फेब्रुवारी रोजी वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक माजलगाव या ठिकानी उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे उद्घाटन बहुजन नेते बाबुराव पोटभरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सभापती जयदत्त नरवडे, उपसभापती श्रीहरी मोरे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती नितीन नाईकनवरे, शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले, शहरप्रमुख धनंजय सोळंके, आझाद क्रांती सेनेचे राजेश घोडे, विलास नेमाने, अविनाश जावळे, पत्रकार संघाचे अध्यक्ष उमेश मोगरेकर, कमलेश जाब्रस, उमेश जेथलिया, हरिष यादव, पुरूषोत्तम करवा, अमर साळवे, बाळासाहेब आडागळे, परमेश्वर सोळंके, धनंजय माने, यांचेसह अनेक मान्यवरांनी अभिवादन केले. जयंती महोत्सव यशस्वी करण्यासाठी बाजार समितीचे सचिव तथा जयंती अध्यक्ष हरिभाऊ सवणे जयंतीचे मार्गदर्शक, आयोजक, निमंत्रक व सर्व जयंती कमिटीने परिश्रम घेतले.

# २३ व्या वर्धापन दिनानिमित्त हरे कृष्ण मंत्र गजरात राधागोविंद मंदिरात रथयात्रा साजरी

बीड । प्रतिनिधी

आंतरराष्ट्रीय कृष्णभावनामृत संघ इस्कॉन बीडच्या वतीने श्री श्री राधा गोविंद मंदिराचा २३ व्या वर्धापन महोत्सवानिमित्त सात दिवसीय विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात ३१ जानेवारी रोजी भव्य श्री कृष्ण बलराम रथयात्रा काढण्यात आली.

रथामध्ये श्री श्री गौर निताई अर्थात कृष्ण बलराम यांची भव्य दिव्य रथयात्रा श्री श्री राधागोविंद मंदिर, सावता





माळी चौक, मोंढा, श्री बालाजी मंदिर, सुभाष रोड जिजामाता चौक या मार्गी काढण्यात आली.

रस्त्यामध्ये भव्य रांगोळ्या व इस्कॉन मंदिरातर्फे महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

यावेळी परमपूज्य लोकनाथ स्वामी महाराज यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, जगातील १५० देशांमध्ये श्रील प्रभुपाद त्यांच्या आदेशानुसार अशा प्रकारच्या रथयात्रांचे आयोजन व पदयात्रांचे आयोजन मागच्या ५७ वर्षापासून होत आहे. हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे! हरे राम हरे राम राम राम हरे हरे !! या महामंत्राचा जयघोष करत संपूर्ण जगाला पवित्र करणारे हरिनाम आज बीड वासियांना पवित्र करत आहे, असेही त्यांनी अनुमोदन केले यावेळी केले.

बीडमध्ये यावेळी विशेष मान्यवर परमपूज्य लोकनाथ स्वामी महाराज, परमपूज्य श्रीकृष्ण चैतन्य स्वामी महाराज, (मॉरिशस) आदी मान्यवर उपस्थित होते. त्याचबरोबर आज काय दिनांक १फेब्रुवारी रोजी सकाळी दहा पासून श्री श्री श्री राधा गोविंद यांचा महाअभिषेक, परमपूज्य लोकनाथ स्वामी महाराज यांच्याद्वारे प्रवचन व श्री राधा गोविंदा यांना पुष्पा अभिषेक करण्यात येईल. या कार्यक्रमाचा सर्व भाविक भक्तांनी लाभ घ्यावा. अशी माहिती इस्कॉन बीड चे प्रतिनिधी श्रीमान कृष्ण नामदास यांनी दिली.

## देव देश आणि धर्म व लोकांच्या न्यायासाठी सातत्याने शासन प्रशासन दरबारी आवाज उठून सर्वसामान्य लोकांना न्याय मिळवून देणारे असे बीड नगरपालिकेचे स्वीकृत नगरसेवक तथा ॲड.गोविंद शिराळे पाटील यांना लोक रत्न पुरस्काराने केले सन्मानित



बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा सत्र न्यायालयातील सुप्रसिद्ध ॲड .तथा देव देश धर्म या साठी सातत्याने लढणारे व लोकांना न्याय मिळवून देणारे मग शहरांमधील नागरिकांना असो किंवा बीड तालुक्यातील त्यांच्या संपर्कात असणाऱ्या लोकांना तसेच बीड जिल्ह्यातील त्यांच्या संपर्कातील लोकांना शासन प्रशासन तसेच न्यायालयाच्या माध्यमातून न्याय मिळवून देणारे असे बीड नगरपालिकेचे स्वीकृत नगरसेवक तथा ॲड.गोविंद शिरोळे पाटील यांच्या उत्कृष्ट कामाच्या बाबतीत लोकशाही पत्रकार संघ व श्री सोमेश्वर हनुमान मंदिर फाउंडेशन च्या वतीने समाधान व्यक्त करून त्यांना लोक रत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले हा लोकरत्न पुरस्कार महाराष्ट्र राज्य लोकशाही पत्रकार संघाचे उपाध्यक्ष ▶▶ उर्वरित पान २ व

**• तत्पूर्वी एडवोकेट तथा बीड नगर परिषदेचे श्रीकृत नगरसेवक मा श्री गोविंद शिराळे पाटील यांनी लोक रत्न पुरस्कार स्वीकार केल्यानंतर त्यांनी थोडक्यात आपले मनोगत या लोकरत्न सत्कार सोहळ्याप्रसंगी उपस्थित असलेले नागरिकांच्या समोर व्यक्त केले की मी बीड शहरातील प्रत्येक प्रभागांमध्ये जाऊन प्रत्येक नागरिकांच्या नगरपालिकेच्या माध्यमातून काय समस्या आहेत त्या जाणून घेऊन सोडवण्यासाठी बीड नगर पालिकेकडे मी प्रयत्नशील राहील व जे गोरगरीब लोक असतील ज्यांना कोर्ट केसेस साठी लढण्यासाठी आर्थिक बाब ज्यांची कमी आहे अशांसाठी आपण मोफत कोर्टामध्ये केस चालवून त्यांना मा न्यायालयाच्या माध्यमातून न्याय देण्याचा प्रयत्न करू असे यावेळी उत्कृष्ट अभ्यासपूर्वक आपले मनोगत एडवोकेट तथा बीड नगरपरिषद चे स्वीकृत नगरसेवक ड.गोविंद शिरोळे पाटील यांनी आपले विचार थोडक्यात व्यक्त केले यावेळी उपस्थित असणाऱ्या सर्व नागरिकांनी टाळ्यांचा कडकडाट केला व त्यांच्या या उत्कृष्ट अभ्यासपूर्वक विचाराचे कौतुक केले व पुढील कार्यास सर्वांनी मनस्वी त्यांना शुभेच्छा दिल्या व नंतर या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन आत्माराम जी वावळकर साहेब कार्याध्यक्ष लोकशाही पत्रकार संघ यांनी केले व हा कार्यक्रम बीड या ठिकाणी मोठ्या उत्साहात संपन्न झाला.**

## ह.भ.प. ज्ञानेश्वरी प्रवक्ते अर्जुन महाराज खाडे यांच्या काल्याच्या कीर्तनाने सांगता





**• ज्ञानेश्वरी मुळे या जीवनाच सार्थक झालं– अर्जुन महाराज खाडे**

वडवणी । प्रतिनिधी

महाराष्ट्रातील नामांकित ज्ञानेश्वरी प्रवक्ते ह.भ.प. अर्जुन महाराज खाडे यांनी वडवणी शहरात प्रारंभ केलेल्या किर्तन महोत्सवाचे यंदाचे हे तेरावे वर्ष असून यानिमित्त भव्य अशा वडवणी कीर्तन महोत्सवाचे आयोजन वडवणी शहरातील मोठा मारोती मंदिराच्या पाठीमागे स्व.गोपीनाथराव मुंडे चौक याठिकाणी करण्यात आले होते. याचा प्रारंभ दिनांक २४ जानेवारी २०२६ शनिवार रोजी पासून सुरु झाला तर आज दिनांक १ फेब्रुवारी २०२६ रविवार रोजी सांगता झाली ज्ञानेश्वरीचे गाढे अभ्यासक देशभरात ज्ञानेश्वरी कथा सोहळा आपल्या अमृतवानीने मंत्रमुग्ध करणारे अर्जुन महाराज खाडेंनी आमृतवानीने इतिहास रचला या भव्य दिव्य भक्ती सोहळ्यासाठी वडवणीत भव्य सभामंडप उभारण्यात आला होता. भाविकांसाठी सर्व प्रकारच्या सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या होत्या होत्या कीर्तन ऐकण्यासाठी दररोज हजारो भाविक भक्तांनी यांचा लाभ घेतला. माणसाने जीवन कसे जगावे हे ज्ञानेश्वरी ▶▶ उर्वरित पान २ वर

## पाटोद्यात मंथन राज्यस्तरीय सामान्य ज्ञान परीक्षेत व्यवस्थेचा फज्जा

### विद्यार्थ्यांना वरांड्यात जमिनीवर बसून परीक्षा देण्याची वेळ: पालकांचा संताप

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा येथे रविवारी दि. ०१ फेब्रुवारी २०२६ रोजी घेण्यात आलेल्या मंथन राज्यस्तरीय सामान्य ज्ञान परीक्षेदरम्यान आयोजकांच्या नियोजनातील गंभीर त्रुटी उघडकीस आल्या. परीक्षा केंद्र म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या प्रियदर्शनी कन्या प्रशाला, पाटोदा येथे विद्यार्थ्यांना बसण्यासाठी पुरेशी व्यवस्था नसल्याने परीक्षेच्या दिवशी गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली.परीक्षेसाठी आलेल्या अनेक विद्यार्थ्यांना वर्ग खोल्यांऐवजी शाळेच्या बाहेरील वरांड्यात बसवण्यात आले,काही विद्यार्थ्यांना डेस्कवर बसवले गेले



तर काहींना थेट जमिनीवर बसून परीक्षा द्यावी लागली. राज्यस्तरीय परीक्षा असूनही विद्यार्थ्यांना अशा परिस्थितीत परीक्षा द्यावी लागल्याने एकाग्रतेवर परिणाम झाल्याचे पालकांनी सांगितले.या प्रकारामुळे विद्यार्थ्यांसोबत आलेल्या पालकांनी तीव्र संताप व्यक्त केला. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य घडवणाऱ्या परीक्षांमध्ये किमान सुविधा पुरवणे ही आयोजकांची जबाबदारी असताना, ती पूर्ण करण्यात आयोजक अपयशी ठरल्याचा आरोप पालकांनी केला आहे. लहान वयोगटातील विद्यार्थ्यांना असुविधाजनक परिस्थितीत बसवणे हे अमानवी ▶▶ उर्वरित पान २ वर

## कंटिन्यूअस प्रोफेशनल डेव्हलपमेंट कार्यक्रम उत्साहात संपन्न

### कृष्णाई नर्सिंग इन्स्टिट्यूट केज तर्फे सीपीडी कार्यक्रमाचे यशस्वी नियोजन

केज । प्रतिनिधी

रेणुका माता कृषी विकास प्रतिष्ठान संचलित कृष्णाई इन्स्टिट्यूट ऑफ बी.एससी. नर्सिंग तसेच महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिल यांच्या संयुक्त विद्यमाने बीड येथे कंटिन्यूअस प्रोफेशनल डेव्हलपमेंट (उझऊ) कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास नर्सिंग तसेच वैद्यकीय क्षेत्रातील अनेक मान्यवर, तज्ज्ञ, प्राध्यापक व नर्सिंग व्यावसायिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे उद्घाटन संस्थेचे सेक्रेटरी श्री. अतुल विक्रमराव मुंडे व श्रीमती रूपालीताई अतुल मुंडे यांच्या हस्ते करण्यात आले. दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचा शुभारंभ



करण्यात आला. कार्यक्रम प्रसंगी प्रमुख मान्यवर म्हणून डॉ. राम आव्हाड सर (गायनॅकॉलॉजिस्ट), जिल्हा रुग्णालय बीड तसेच डॉ. ऋषिकेश पानसंबळ सर (पीडियाट्रिक स्पेशालिस्ट), जिल्हा रुग्णालय बीड यांची उपस्थिती लाभली. यासोबतच श्रीमती रंजना दाणे (असिस्टंट मॅट्रन, जिल्हा रुग्णालय बीड) व श्रीमती पाटील मॅडम (नर्सिंग इन्चार्ज, उपजिल्हा रुग्णालय बीड) यांनीही कार्यक्रमाला उपस्थित राहून मार्गदर्शन केले.

मान्यवरांनी नर्सिंग व वैद्यकीय क्षेत्रातील सद्यस्थिती, भविष्यातील संधी तसेच गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा देण्यासाठी सतत व्यावसायिक विकासाचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी कृष्णाई इन्स्टिट्यूट ऑफ बी.एससी. नर्सिंगचे प्रभारी प्राचार्य प्रवीण खुणे सर यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमास गव्हर्नमेंट मेडिकल कॉलेज, सातारा येथील सानप धनराज सर, तुषार खाडे सर, अनिस मुला सर, मेघराज सानप, राहुल कोकणे सर, युवराज सानप तसेच ॲड. नारायण शिरसाट सर यांची उपस्थिती लाभली.

या कार्यक्रमासाठी प्रमुख प्रवक्ते म्हणून ओंकार जगदाळे सर (इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग एज्युकेशन, मुंबई), प्रवीण जरांगे सर, जायभाये सर तसेच नितीन मोराळे सर (एस.आर. टी.एस., अंबाजोगाई) यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. प्रवक्त्यांनी नर्सिंग शिक्षणातील बदल, व्यावसायिक विकासाचे महत्त्व, आधुनिक आरोग्यसेवा पद्धती तसेच करिअरच्या नव्या संधी यावर सखोल व प्रेरणादायी मार्गदर्शन केले. कार्यक्रमात नर्सिंग क्षेत्रातील वाढत जाणाऱ्या संधी, आरोग्यसेवेमधील तंत्रज्ञानाचा वाढता वापर तसेच वैद्यकीय क्षेत्रातील झपाट्याने होणारे आधुनिकीकरण यावर सखोल मार्गदर्शन करण्यात आले. बदलत्या काळानुसार वैद्यकीय व नर्सिंग क्षेत्रात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांनी नवे तंत्रज्ञान आत्मसात ▶ उर्वरित पान २ वर

## स्व. अजित दादा पवार यांना तलवाडा पंचक्रोशीतील सर्व समाज बांधवांच्या वतीने त्वरितापुरी विद्यालयात सर्व पक्षीय श्रद्धांजलि

तलवाडा । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील त्वरितापुरी कला व विज्ञान महाविद्यालय यांच्या संयुक्त विध्यामाने महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष, तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री स्वर्गीय अजित दादा पवार यांना श्रद्धांजलि अर्पित करण्यासाठी शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. स्वर्गीय अजित दादा पवार यांच्या अकाली निधनामुळे महाराष्ट्रावर आनाकालीन पसरलेली शोकाकुल शोककळा प्रतेकांच्या जिवाला एक प्रकारच्या धक्का देऊन गेलेली असून दादांच्या




अकाली व अपघाती झालेल्या निधनाच्या आणुषंगाने तलवाडा याठिकाणी त्यांना सर्व गावकऱ्यांच्या वतीने श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी त्वरितापुरी कला व विज्ञान महाविद्यालय तलवाडा या ठिकाणी शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी त्वरितापुरी कला व विज्ञान महाविद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष सुरेश हात्ते साहेब, प्राचार्य चोरमले सर, दत्ताभाऊ हाते, मदन काळे सर, भारत चव्हाण सर, शहेंशाहभाई सौदागर, पिंटु गर्जे, पत्रकार बापू गाडेकर, पत्रकार अल्ताफ कुरेशी, पत्रकार तुळशीराम वाघमारे, विष्णू राठोड, आर आर बहिर, राधाकिसन महराज शिंगने, सेवा सोसायटी चेअरमन नाटकर, बाबूराव शिंगने, दादा उढाण, दत्तात्रय निकम, विकास हात्ते, मच्छिंद्र थोरात, त्वरितापुरी कला व विज्ञान महाविद्यालयाचे सर्व विद्यार्थी, विध्यार्थ्यीनी सह पालक वर्ग शिक्षक वृंद व गावकऱ्यांची लक्षणीय उपस्थिति या शोकसभा स्थळी दिसुन आली.

**• स्वर्गीय अजित दादा पवार यांना त्वरितापुरी कला व विज्ञान महाविद्यालयाच्या विध्यार्थ्यांसह विविध मान्यवरांनी या शोकसभेच्या माध्यमातून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली यावेळी तलवाडा येथील अजित दादा पवार यांचे निकटवर्ती नजीरभाई कुरैशी हे दादांना श्रद्धांजलि पर दोन शब्द: बोलण्यासाठी ऊभे राहिले तेव्हा गहिवरुन आले. दादांच्या कार्यपद्धतिचे वर्णन करत आसतांना कुटुंबातील सदस्या प्रमाणे शोकसभा संपेपर्यंत नजीरभाई कुरैशी धायमोकुलुन रडले.**

## शेतकरी व पशुधन हितासाठी अभिनव संशोधनास भारत सरकारचे पेटंट

### रोहित चव्हाणचे गौरवशाली यश ; गेवराईचे नाव राष्ट्रीय पातळीवर केले उज्वल

गेवराई । प्रतिनिधी



शेतकरी आणि पशुधन संरक्षणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या अभिनव संशोधनास भारत सरकारकडून पेटंट (डिझाइन नोंदणी) प्राप्त झाल्याने गेवराई तालुक्याचे नाव राष्ट्रीय पातळीवर उज्ज्वल झाले आहे. व्हेटरनरी शिक्षण घेत असताना रोहित राजेंद्र चव्हाण याने केलेल्या संशोधनास भारत सरकारच्या पेटंट कार्यालयाकडून 'डिझाइन अधिनियम २०००' अंतर्गत अधिकृत नोंदणी मिळाली असून हे यश ग्रामीण भागातील तरुण संशोधकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. गेवराई कृषी कार्यालयातील सहाय्यक कृषी अधिकारी राजेंद्र चव्हाण यांचा मुलगा रोहित चव्हाण याने विकसित केलेल्या संशोधनाचे नाव आपत्तीच्या वेळी पशुधनाच्या सुरक्षित बचावासाठी पशूंना नियंत्रित करून सोडवणारे विशेष उपकरण असे आहे. या संशोधनामध्ये पूर, आग, भूकंप, अपघात अशा नैसर्गिक व मानवनिर्मित ▶ उर्वरित पान २ वर